ePaper

## “महात्मा गांधींचा जातीभेदावर विश्वास होता”; रणजीत सावरकरांचा गंभीर आरोप



| वर्ष - 6 | अंक - 224 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

■ निसर्गातील त्रिसूत्रीचे संवर्धन सेंद्रिय शेती मधूनच होऊ शकते
■ “रिव्हर सायक्लॉन”द्वारे पिंपरी-चिंचवडकरांचे ‘वर्ल्ड रेकॉर्ड’?
■ आता उद्धव ठाकरेंचंही 'लाव रे ती क्लिप'!

www.mahaenews.com | रविवार | दिनांक 27 नोव्हेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# राष्ट्रवादी महिला काँग्रेस आक्रमक!

## बोम्मई, रामदेवबाबांचा निषेध : पिंपरी चौकात आंदोलन




> रामदेव बाबा हे भाजपधार्जीण्या विचारांचे आहे. ते नेहमीच भाजपचा छुपा अजेंडा आपल्या कार्यक्रमातून, वक्तव्यातून राबवत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. मात्र, यावेळी त्यांनी महिलांबाबत वादग्रस्त विधान केले. रामदेव बाबा यांनी जाणून बुजून महिलांविषयी अश्लील, लज्जा उत्पन्न होणारे वक्तव्य केले आहे. याविषयीची क्लिप प्रसार माध्यम व इतर माध्यमातून सर्वत्र फिरत आहे. रामदेव बाबा यांनी केलेले कृत्य हे जाणून बुजून केले आहे. त्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल होऊन कडक कारवाई झाली पाहिजे.
> **- कविता आल्हाट, शहराध्यक्ष,** राष्ट्रवादी महिला काँग्रेस.

**पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।**

**कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई आणि योगगुरू रामदेव बाबा यांनी केलेल्या वादग्रस्त विधानाच्या निषेधार्थ राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने शनिवारी पिंपरी येथे आक्रमक आंदोलन केले. या दोघांच्या विधानाबाबत संताप व्यक्त करत दोघांवर कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.**

पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये हे आंदोलन करण्यात आले.

आंदोलनात युवक काँग्रेसचे अध्यक्ष इम्रान शेख, युवती अध्यक्षा वर्षा जगताप, तसेच ओबीसी सेल अध्यक्ष विजय लोखंडे, कार्याध्यक्ष कविता खराडे, अर्बन सेलचे दत्तात्रय जगताप, काशीनाथ जगताप, अकबर मुल्ला, निर्मला माने, मिरा कदम, दिपाली देशमुख, ज्योति गोफाने, ज्योति तापकीर,समिता गोरे, सुनीता आल्हाट, मनीषा पवार, सारिका पवार, ज्योती निंबाळकर, सारिका हरगुदे, माधुरी जट्टेवाडकर, शारदा सोडी, अर्चना जाधव, विजय दळवी, दीपक गुप्ता, संदिप चव्हाण, अनिल भोसले, अंनत सुपेकर, किरण नवले, राजेंद्र हरगुडे, रवींद्र सोनवणे आदी उपस्थित होते.

नुकतेच ठाणे येथील कार्यक्रमात रामदेव बाबा यांनी महिलांच्या पेहराव, कपडे, सुंदरता या विषयी वादग्रस्त वक्तव्य केले. तर, कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी महाराष्ट्राच्या सीमेवरील जत तालुक्यातील 42 गावे कर्नाटक राज्यात येण्याच्या तयारीत आहेत, असे विधान केले. या दोघांच्या विधानाविरोधात सर्व स्तरावरून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

# ट्रायोज व झुलेलाल टॉवर्स सोसायटीचा प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लावणार!

## सोसायटीमधील रहिवाशांना माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांचे आश्वासन

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।**



**पिंपळे सौदागरमधील ट्रायोज व झुलेलाल टॉवर्स सोसायटी रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावणे ही प्रथम प्राथमिकता असल्याचे मत माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी व्यक्त केले आहे.**

शत्रुघ्न काटे यांच्या सतत पाठपुराव्यामुळे पिंपळे सौदागर परिसरातील ट्रायोज आणि झुलेलाल टॉवर्स येथील रस्त्याचे ग्राऊंटिंगच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. ट्रायोज आणि झुलेलाल टॉवर्स या सोसायटीमधील राहिवासीयांनी शत्रुघ्न काटे यांच्याकडे या रस्त्याच्या दुरावस्था बाबत तक्रार केली होती.

याची दखल घेत शत्रुघ्न काटे यांनी तातडीने स्थापत्य विभागला सूचना देत सदर रस्त्याच्या ग्राऊंटिंगचे काम सुरू करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. या रस्त्याची दुरवस्था दूर करून लवकरात लवकर या रस्त्याचे डांबरीकरण करणे ही सर्वात प्राथमिक बाब असल्याचे शत्रुघ्न काटे यांनी सांगितले. तसेच शत्रुघ्न काटे यांच्या पुढाकाराने या रस्त्याच्या कामास सुरुवात झाल्याने ट्रायोज आणि झुलेलाल टॉवर्स सोसायटी राहिवासी यांनी समाधान व्यक्त केले आहे.

> **ट्रायोज आणि झुलेलाल टॉवर्स येथील रस्त्याचे ग्राऊंटिंगच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे. ट्रायोज आणि झुलेलाल टॉवर्स या सोसायटीमधील राहिवासीयांनी शत्रुघ्न काटे यांच्याकडे या रस्त्याच्या दुरावस्था बाबत तक्रार केली होती.**

## शॉर्ट न्यूज »

### महिलांसाठी १९ मार्गावर धावणार ‘महिला स्पेशल बस’

। पुणे । महाईन्यूज ।

पुणे : महिलांचा पीएमपी बसमधून होणारा प्रवास आता अधिक सुरक्षित होणार आहे. कारण पीएमपी प्रशासनाने महिला प्रवाशांसाठी महिला विशेष बस सोडण्याचा निर्णय घेतला आहे. सोमवार (ता.२८) नोव्हेंबर पासून १९ मार्गावर २४ बस धावणार आहे. या बसमध्ये महिला वाहकांची नेमणूक करण्यात येणार आहे, अशी माहिती मुख्य वाहतूक व्यवस्थापक दत्तात्रेय झेंडे यांनी सांगितले. पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील महिला प्रवाशांसाठी सकाळी व सायंकाळी गर्दीच्या वेळी या बस सोडण्यात येणार आहे. उर्वरित वेळी या बसमधून पुरुष व महिला प्रवास करू शकतील. या मार्गावर धावणार महिला बस- - स्वारगेट ते येवलेवाडी - स्वारगेट ते हडपसर, अ.ब.चौक ते सांगवी, म.न.पा. भवन ते लोहगाव, कोथरूड डेपो ते विश्रांतवाडी (बी.आर.टी मार्ग ), -(बी.आर.टी) कात्रज ते महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, - (बी.आर.टी) कात्रज ते कोथरूड डेपो.

# निसर्गातील त्रिसूत्रीचे संवर्धन सेंद्रिय शेती मधूनच होऊ शकते!

## श्री संत तुकाराम महाराज सहकारी साखर कारखाना लि. चे संस्थापक अध्यक्ष विदुरा नवले यांचे प्रतिपादन

। पुणे। महाईन्यूज ।

**निसर्गातून पुन्हा निसर्गाकडे हे सेंद्रिय शेतीचे मूलतत्त्व असून पर्यावरण, प्रदूषण व आरोग्य या त्रिसूत्रीचे पालन फक्त सेंद्रिय शेतीतून साधले जाऊ शकते, असे प्रतिपादन माजी खासदार व श्री संत तुकाराम महाराज सहकारी साखर कारखाना लि. चे संस्थापक अध्यक्ष विदुरा नवले यांनी आज येथे केले.**



शहरातील 'ताथवडे' येथे उभारण्यात आलेल्या 'इरिच इंटल इंडिया लिमिटेड' कंपनीच्या सेंद्रिय खते उत्पादन प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. सेवानिवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. विठ्ठलराव जाधव, माजी महापौर उषा ढोरे, कृषी तज्ज्ञ विजय ठुबे, माजी उपमहापौर झामाताई बारणे, 'इरिच ग्रुप ऑफ कंपनीज्'चे संस्थापक-अध्यक्ष प्रदीप शेळके, 'इरिच इंटल इंडिया लि.' चे चेअरमन शहाजी बारणे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

'रचनात्मक शेती करण्याकडे अलीकडच्या काळात शेतकरी नवनवीन प्रयोग व संशोधन करीत असून पिकांची वाढ व उत्पादन क्षमतेचा विकास केवळ सेंद्रिय खतांच्या माध्यमातून होतो असे विदुरा नवले यांनी यावेळी पुढे म्हटले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. विठ्ठलराव जाधव यांनी, 'बदलत्या काळानुसार निसर्ग व पर्यावरण वाचवण्याची जबाबदारी आज सर्वांवर आली आहे. भविष्याचा वेध घेणारा 'इरिच इंटल इंडिया लि.' कंपनीचा हा प्रकल्प सामाजिक दायित्व म्हणून या खत निर्मिती प्रकल्पामध्ये उतरला असल्याचे पाहून समाधान वाटते' अशी भावना त्यांनी व्यक्त केली. माजी महापौर उषा ढोरे, शामराव राक्षे, विजय ठुबे, यांचीही याप्रसंगी भाषणे झाली.

'इरिच इंटल इंडिया लि.'चे संचालक लक्ष्मण सावंत यांनी, उपस्थितांना, कंपनीच्या उत्पादनांची माहिती दिली.तर, संचालक संजय धनवे यांनी कंपनीचे ध्येय व उद्दिष्टे याचा परिचय पाहुण्यांना करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कंपनीचे चेअरमन शहाजी बारणे यांनी केले. प्रगतशील शेतकरी मारूती शेळके, दत्तात्रय बारणे पाटील, शिवराम भोंडवे, मुक्ताजी नाणेकर, रामचंद्र मोहिते पाटील, शाम राक्षे, मधुकर भोंडवे आदींचा सन्मान यावेळी करण्यात आला.

संचालक विलास पाटील, ज्ञानेश देवडे, विशाल गावडे यांनीही उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन 'इरिच इंटल इंडिया लि.' कंपनीचे संचालक विजय बोत्रे पाटील यांनी केले तर 'इरिच ग्रुप ऑफ कंपनीज्'चे संस्थापक - अध्यक्ष प्रदीप शेळके यांनी आभार मानले.

# कचरा डेपोवर होणार ऊर्जा निर्मिती!

## राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर महापालिका करणार सौरऊर्जेची निर्मिती

पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे : शहरातील कचरा वर्षानुवर्षे फुरसुंगी, उरुळी देवाची येथे टाकल्याने परीसरातील जमीन, पाणी, हवा प्रदूषित झाली आहे. यासंबंधाने ग्रामस्थांनी संघर्षाची भूमिका घेतल्याने तेथे कचरा टाकणे बंद झाले आहे. आता या ठिकाणी महापालिका पर्यावरणपूरक प्रकल्प राबवत आहे. राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर सौरऊर्जेची निर्मिती महापालिका करणार आहे.

पुणे शहरातील कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी राज्य सरकारने १९९१ ला उरुळी देवाची- फुरसुंगी येथे १४३ एकर जागा दिली. त्यानंतर १९९९ ला कोथरूड येथील कचरा डेपो बंद करून शहरातील कचऱ्याच्या गाड्या उरुळी देवाची, फुरसुंगीला जाऊ लागल्या. शहरात रोज शेकडो टन कचरा निर्माण होत असल्याने या भागात कचऱ्याचे उंचच्या उंच डोंगर तयार झाले. प्रक्रिया न करता उघड्यावर टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याची (ओपन डंपिंग) प्रचंड दुर्गंधी सुटू लागली.

या भागातील प्रदूषण वाढल्याने गावकऱ्यांनी वारंवार आंदोलने केली. एनजीटीमध्ये याचिका दाखल झाली. न्यायालयाने उघड्यावर कचरा टाकणे बंद करा असे आदेश दिले, त्यानंतर पुण्यात कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया २००७ मध्ये सुरू झाली, त्यात २०२२ मध्येहीी सुधारणा करण्याचे काम सुरू आहे. या १५ वर्षात महापालिकेने या कचरा डेपोवर पडलेला लाखो मेट्रिक टनाचे शास्त्रीय पद्धतीने कॅपींग करून हा परिसर दुर्गंधीमुक्त करण्याचे काम केले. उरुळी देवाची येथील कचरा डेपो आणि प्रकल्पाच्या संदर्भात अनेक याचिका दाखल आहेत. त्यापैकी एका याचिकेत एनजीटीने महापालिकेला दोन कोटी रुपयांचा दंड ठोठावला होता. याच रकमेतून या कचरा डेपोच्या परिसरात पर्यावरणपूरक कामे करण्याचे आदेश एनजीटीने दिले होते. त्यामध्ये कचऱ्यातील दुर्गंधीयुक्त पाणी (लिचेड) वाहून जाण्यासाठी गटारे बांधली, कचरा डेपोच्या जागेवर मोठ्याप्रमाणावर वृक्षारोपण करून तेथे हिरवळ फुलवली आहे. त्यानंतर आता सौर ऊर्जा निर्मितीसाठी महापालिकेने पाऊल उचलले आहे.

### 100 किलोवॅटचा प्रकल्प

**कचरा डेपोच्या आवारात प्रक्रिया प्रकल्पांसाठी उभारण्यात आलेल्या मोठ्या शेडवर सोलर पॅनेल बसवून सौरऊर्जा निर्माण केली जाणार आहे. यासाठीच महापालिकेने निविदा प्रक्रिया राबविली. या प्रकल्पासाठी मे. पीईसी पॉवर इन्फा यांची एकच निविदा आली. त्यानुसार या कंपनीला हे काम ५६ लाख ७३ हजार ४७३ रुपयांना देण्यास स्थायी समितीने मान्य दिली आहे. याठिकाणी निर्माण होणारी ऊर्जा कचरा डेपोच्या आवारातील पथदिवे, वजन काटा, तसेच पंप हाउसच्या मोटारी, सीसीटीव्ही यंत्रणा यासाठी वापरली जाईल. अतिरिक्त वीज नेट मिटरींगच्या च्या माध्यमातून महापारेषणला विकली जाईल.**



**“एनजीटीने महापालिकेला दंड केला होता, हा दंड पर्यावरणपूरक कामासाठी वापरला जात आहे. ५६ लाख रुपये खर्च करून १०० किलोवॅट वीज निर्मिती केली जाईल. ही वीज गरजेपेक्षा जास्त असल्याने अतिरिक्त वीज महापारेषणला विकण्याचे नियोजन आहे. तसेच या ठिकाणी आणखी जागा उपलब्ध आहे, त्यामुळे निधी उपलब्ध झाल्यास वीज निर्मिती वाढवता येईल आणि त्यातून उत्पन्न मिळवणे शक्य आहे.”**

**- श्रीनिवास कुंदूल, मुख्य अभियंता, विद्युत विभाग**

**“एनजीटीच्या आदेशानुसार उरुळी देवाची येथे पर्यावरणपूरक कामे केली जात आहेत. त्याच माध्यमातून विद्युत विभागाला ५० लाखाची निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यातून सौर ऊर्जा निर्मिती होणार आहे.”**

**- आशा राऊत, उपायुक्त, घनकचरा व्यवस्थापन विभाग**

# India's Biggest Cyclothon in Pimpri Chinchwad



## संपादकीय »

# डिजिटल उपवास

***यवतमाळमधले बान्सी आणि उस्मानाबादमधले जकेकूरवाडी ही दोन गावे या आठवड्यात सगळीकडे झळकली ती त्यांनी केलेल्या त्यांच्या गावापुरत्या मोबाइलबंदीसाठी.***

मोबाइल न वापरणारा माणूस थेट अश्मयुगातूनच अवतरलेला असावा असे मानून घेण्याचा सध्याचा जमाना. मी समाजमाध्यमे वगैरे वापरत नाही, असे म्हणणारेही याच न्यायाने आदिमानवाचे भाऊबंद ठरू शकतात. मोबाइल, समाजमाध्यमे, ओटीटी प्लॅटफॉर्म या सगळ्यांनी आजच्या माणसाचे जगणे असे काही झपाटून टाकले आहे की नेटफ्लिक्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी रीड हास्टिंग खुलेआम सांगतात की आमची स्पर्धा इतर कुणाशी नाही तर फक्त माणसाच्या झोपेशी आहे. असे सगळे चाललेले असताना कुणीतरी उठते आणि विशिष्ट वयाच्या मुलांसाठी सरळ मोबाइल वापरावर बंदी आणते, हे खरे तर जगाच्या विपरीत वागणे. पण त्याची चर्चा झाली कारण खेळणे, बागडणे सोडून आज घराघरांतील मुले अक्षरश: हातात मोबाइल घेऊन बसलेली दिसतात. अर्थात मुलांचीच नाही तर मोठ्या माणसांचीही तीच परिस्थिती आहे. काही वर्षांपूर्वी विविध टीव्ही वाहिन्यांनी जे वेड लावले होते, त्याच्याही पुढची गत आज दिसते. या पार्श्वभूमीवर बान्सी आणि जकेकूरवाडी या दोन्ही गावांनी उचललेले पाऊल थोडे टोकाचे खरे, पण काळाची गरज अधोरेखित करणारे आहे.

या दोन्ही गावांनी केले काय तर बान्सी गावाने १८ वर्षांखालील मुलांच्या मोबाइल वापरावर थेट बंदीच आणली. तीही ग्रामसभेत ठराव वगैरे करून. गावातील सगळ्यांनाच हा निर्णय पटला नसला, त्याच्या मर्यादा त्यांना जाणवत असल्या तरी हा प्रयोग करून बघायला हरकत नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. तर जकेकूरवाडी या गावात संध्याकाळी सहा ते रात्री आठ या वेळेत संपूर्ण गावातच मोबाइल आणि टीव्हीसुद्धा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला गेला आहे. हे केवळ ग्रामीण शहाणपण म्हणून त्याकडे दुरून पाहता येणार नाही. भारताची 'माहिती-तंत्रज्ञान राजधानी' ठरण्यासाठी हैदराबादशी स्पर्धा करणाऱ्या बेंगळूरमध्ये तर एखाद्याला मोबाइल आणि तत्सम उपकरणांच्या पगड्यामधून सुटका करून घ्यायची असेल तर त्यासाठी मदत करणारी 'हेल्पलाइन' हल्लीच सुरू झाली आहे. अर्थात वैयक्तिक पातळीवरही काहीजण डिजिटल तंत्रज्ञानाच्या मोहमायेपासून दूर राहण्याचा आपापल्या पातळीवर प्रयत्न करताना दिसतात. कुणी सुट्टीच्या दिवशी जास्तीत जास्त काळ मोबाइल आणि गॅजेट्सपासून दूर राहण्याचे ठरवतात. कुणी झोपताना मोबाइल आपल्यापासून पूर्णत: लांब असेल असे पाहतात. कुणी उठल्या उठल्या तासभर तरी मोबाइलला अजिबात हात न लावण्याचा निश्चय करतात तर कुणी दिवसातून फक्त दोन किंवा तीन वेळाच समाजमाध्यमांवर फिरकतात.



## आनंदी सकाळ

### प्रारब्धवशात मिळेल ते आनंदाने स्वीकारावे...

वैराग्य म्हणजे मनाने कोठेही न गुंतणे. भोगांचा त्याग असा वैराग्याचा अर्थ नाही. जे प्रारब्धवशात मिळेल ते आनंदाने स्वीकारायचे. आपल्याला सुंदर सुवासिक फुले आवडतात तर ती घ्यायची, पण त्याचा उपयोग भगवंतासाठी करणे हे वैराग्याचेच लक्षण आहे. जे आपल्याला आवडते ते सर्व देवाला अर्पण करायचे व त्यापासून आनंद उपभोगायचा. वैभव त्याचे वाढले पाहिजे. सौंदर्य त्याचे वाढले पाहिजे. त्याच्यापुढे मला माझ्या देहाची किंमत शून्य वाटली पाहिजे. असे होणे म्हणजे देहअहंता कमी होणे होय. वैराग्य म्हणजे साऱ्या उपभोगांचा त्याग करून भगवी वस्त्रे घालून बसणे नव्हे, तर आलेले भोग आनंदाने भोगून त्यात लिप्त न होणे. तितिक्षा म्हणजे आपल्यावर एखादे संकट येऊ पहात आहे अथवा आले आहे तरी, त्यापासून आपला बचाव करण्याचा अजिबात प्रयत्न न करणे. सर्व कर्तृत्व त्या भगवंताकडे देणे व त्याची लीला आनंदाने बघणे. आपल्यावर एखादे संकट येणार म्हटल्यावर माणूस किती घाबरतो.

# तात्त्विक लढाईचे मोल पैशांत?



## भूमिका

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत १४ जुलै रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत, आणीबाणीत कारावास भोगलेल्यांना मानधन देण्याची योजना पुन्हा सुरू करण्याचा निर्णय झाल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी जाहीर केले आहे. अर्थात हा निर्णय घेताना मंत्रिमंडळाचा विस्तार व्हायचा होता. पण आमच्या दोघांचे मंत्रिमंडळ कोणताही निर्णय घ्यायला समर्थ आहे, प्रथा म्हणून पुढे विस्तार होईलच असे सूचित करणारा हा निर्णय आहे. हे वास्तव अधोरेखित करण्यासाठीच नामांतरासह काही निर्णय घेतले, त्यातील हा निर्णय.

हा निर्णय जाहीर करताना उपमुख्यमंत्री म्हणाले, 'आणीबाणी ही लोकशाहीच्या विरोधातील घटना होती. त्या विरोधात आवाज उठवणाऱ्यांनी स्वातंत्र्य तसेच लोकशाहीसाठी कारावास भोगला. माझे वडीलही तुरुंगात होते. त्यामुळे आणीबाणीविरोधात लढा दिलेल्यांच्या सन्मानासाठी ही मानधन योजना पुन्हा सुरू केली आहे.' तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ३ जुलै २०१८ रोजी ही मानधन योजना सुरू केली होती. मात्र महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळात करोनामुळे आर्थिक परिस्थिती बिघडल्याने काटकसरीचे कारण देऊन, ३१ जुलै २०२० रोजी ही योजना बंद करण्यात आली होती. महाविकास आघाडी सरकारमध्ये काँग्रेसचा समावेश होता आणि आणीबाणी त्याच पक्षाने देशावर लादली. 'त्यांच्या दबावामुळे उद्धव ठाकरे सरकारने ही योजना बंद केली असावी,' असा आरोप फडणवीस यांनी केला. आता सत्ताबदल झाल्याने १ ऑगस्ट २०२२ पासून ही मानधन योजना पुन्हा सुरू करण्यात येणार आहे. गेल्या सुमारे दोन वर्षांची थकबाकीही देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आणीबाणीच्या काळात एक महिन्यापेक्षा जास्त कारावास भोगलेल्या व्यक्तींना दरमहा दहा हजार रुपये आणि त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी/ पतीस पाच हजार रुपये मानधन, तर एक महिन्यापेक्षा कमी कारावास भोगलेल्या व्यक्तींना दरमहा पाच हजार रुपये तर त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी/ पतीस अडीच हजार रुपये मानधन देण्यात येईल. या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे नव्याने अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर २०२२ पर्यंत आहे. ३ जुलै २०१८ च्या शासन निर्णयानुसार आवश्यक शपथपत्रासह जिल्हाधिकारी कार्यालयाकडे अर्ज सादर करणे आवश्यक राहील असेही सरकारने जाहीर केले आहे. 'हे सरकार माननीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर चालेल' आणि 'आमचीच शिवसेना खरी आहे' असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सतत सांगतात. पण बाळासाहेब ठाकरे यांनी आणीबाणीचे समर्थन केले होते व इंदिरा गांधी यांना पाठिंबा दिला होता. याकडे एकनाथ शिंदे यांनी २०१८ प्रमाणेच आत्ताही सोयीस्कर दुर्लक्ष केले आहे. मंत्रिमंडळाची स्थापना व्हायच्या आधीच बाळासाहेबांच्या विचारांपासून दूर जात भाजपमागे त्यांची फरफट सुरू झाली आहे, याची ही झलक आहे. महाविकास आघाडीला अनैसर्गिक म्हणून हिणवणाऱ्या भाजपने नवी आघाडीही अनैसर्गिक आहे ह सिद्ध करायला प्रारंभ केला आहे. त्यात बळी फुटीरांचा जाणार असे दिसते.ही जोडी रोज मंत्रालयात बसुन आहे.

# महाराष्ट्रातल्या कांद्याला इतर राज्यांनी रडवले...

**कांद्याकडे अन्य राज्यांतील शेतकरी वळत असताना निर्यातीची दारे मात्र बंद होत आहेत. यावर उपाय आहेत, पण ते करणार कोण?**

भारतीय शेती संपूर्णपणे निसर्ग आणि सत्ताधाऱ्यांच्या लहरीपणावर अवलंबून असते, असे म्हटले जाते. त्यातही कांदा उत्पादकांना या लहरीपणाचा अनुभव कायमच येतो. यंदाचे वर्षही त्यास अपवाद ठरलेले नाही. देशातील प्रमुख कांदा उत्पादक राज्य असलेल्या महाराष्ट्रात शेतकऱ्यांना गडगडणाऱ्या दरामुळे दरवर्षी रस्त्यावर उतरण्याची वेळ येते. सप्टेंबरपासून पुन्हा आंदोलनांची मालिका सुरू झाली असून कांद्याचे दर कधी वाढतील आणि आंदोलने कधी थांबतील, हे सांगणे सध्या तरी अवघड झाले आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर या कालावधीत कांद्याचे दर सहसा शेतकऱ्यांना परवडणारे असतात; परंतु हे वर्ष त्यास अपवाद ठरले. चाळींमध्ये मोठ्या प्रमाणावर साठविलेला माल, इतर राज्यांमध्येही आता बऱ्यापैकी कांदा उत्पादन होऊ लागल्याने देशांतर्गत महाराष्ट्राच्या कांद्यास कमी झालेली



मागणी, निर्यातीसाठी ठरावीक देशांवरच अवलंबून राहण्याचे धोरण, अशी काही कारणे यामागे आहेत.या 'स्कूल'चा पायाच मुळी जॉर्ज ऑरवेल म्हणतो त्याप्रमाणे, 'अज्ञान हीच शक्ती' या सिद्धांतावर बेतलेला आहे. यातून 'की एलिमेन्टस ऑफ डेमोक्रेटिक गव्हर्मेन्ट' हा धडा वगळण्यात आला आहे. त्यात लोकशाहीचा विस्तृत परिचय करून देण्यात आला होता. तर 'डेमोक्रसी अॅण्ड डायव्हर्सिटी अॅण्ड चॅलेंजेस' हा धडाही वगळण्यात आला आहे. त्यात वेगवेगळ्या जाती आणि त्यांच्या आधारावर केलं जाणारं सामाजिक विभाजन, असमानता याबद्दल माहिती होती. उदा. 'जाति व्यवस्था के नियमों को कुछ इस तरह से बनाया गया था की तथाकथित अछूत अपने लिए निर्धारित काम से इतर कोई और काम नही कर सकते थे। कुछ समूहों को कचरा और गांव से मृत जानवरों को उठाने के लिए मजबूर किया गया। उन्हे उंची जाती के लोगां के घरों मे जाने और गांव के कुए से पानी लेने की इजाजत नही थी। ना ही वो मंदिरो में जा सकते थें। उनके बच्चे स्कूलों मे दुसरी जाती के बच्चों के साथ नही बैठ सकते थे।' देशाचा विचार करता सुमारे १२ लाख हेक्टरवर कांदा लागवड होते. त्यात महाराष्ट्र आणि महाराष्ट्रात नाशिक कांदा उत्पादनात अग्रेसर आहे. उन्हाळी कांदा मार्च-एप्रिलमध्ये बाजारात येतो. साधारणपणे सहा महिने टिकणारा हा कांदा असल्याने शेतकरी तो चाळींमध्ये साठवून ठेवतात. गरजेप्रमाणे त्याची विक्री करतात. उन्हाळ्यात चाळींत साठवलेला कांदा ऑक्टोबरपर्यंत बाजाराची गरज भागवतो.

## ।। अभंगवाणी ।।



आलिंगनें घडे ।  
मोक्ष सायुज्यता जोडे ॥१॥  
ऐसा संताचा महिमा ।  
जाली बोलायाची सीमा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ।। दशक्रिया विधी ।।



## श्रीमती. हिराबाई सुर्यकांत काळजे

कळविण्यात अत्यंत दु:ख होते की, श्रीमती. हिराबाई सुर्यकांत काळजे (वय ७२ वर्ष) यांचे शनिवार, दि. २६/११/२०२२ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिर:शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

### * दशक्रिया विधी *

रविवार, दि. २७/११/२०२२ रोजी स. ८.वा.
इंद्रायणी काठी चऱ्होली बु.।। येथे होईल.

### * शोकाकुल *

मा. श्री. नितीनआप्पा प्रतापराव काळजे
(मा. महापौर, पिं.चिं. मनपा)

श्री. अरुणदादा ज्ञानेश्वर काळजे
(मा. संचालक, संत तुकाराम स.का.)
श्री. प्रविण पोपटराव काळजे
(संचालक, संत तुकाराम स.का.)
श्री. सतिश महाराज राजाराम काळजे
(महाराष्ट्र राज्य वारकरी महामंडळ अध्यक्ष)
श्री. बाळासाहेब ज्ञानेश्वर काळजे
श्री. विलास ज्ञानेश्वर काळजे
श्री. नंदकुमार पोपटराव काळजे
श्री. चंद्रकांत पोपटराव काळजे

श्री. प्रतापराव तुकारम काळजे
श्री. मुरलीधर तुकाराम काळजे
श्री. बाळकृष्ण तुकाराम काळजे
श्री. संतोष सुर्यकांत काळजे
श्री. गणेश सुर्यकांत काळजे
श्री. कान्हा सुर्यकांत काळजे
श्री. दादासाहेब सुदाम काळजे
श्री. संगीत प्रल्हाद काळजे

**समस्त काळजे परिवार**

## भोसरीत उसळणार सायकलपटूंचा महापूर

# “रिव्हर सायक्लॉन”द्वारे पिंपरी-चिंचवडकरांचे ‘वर्ल्ड रेकॉर्ड’?

### आतापर्यंत तब्बल 16 हजारहून अधिक नोंदणी

। पिंपरी। महाईन्यूज ।

**इंद्रायणी नदी संवर्धन आणि पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यासाठी आयोजित केलेल्या ‘रिव्हर सायक्लोथॉन’द्वारे पिंपरी-चिंचवडकर जागतिक विक्रम करण्याच्या तयारीत आहेत. आतापर्यंत या सायकल रॅलीसाठी तब्बल १६ हजारहून अधिक सायकलपटू-पर्यावरण प्रेमी नागरिकांनी नोंदणी केली आहे. त्यामुळे संपूर्ण पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्राचे लक्ष या रॅलीकडे लागले आहे.**




भारतीय जनता पार्टीचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि पिंपरी-चिंचवड महापालिका, अविरत श्रमदान, सायकल प्रेमी अशा विविध संस्था, संघटनांच्या पुढाकाराने उद्या रविवार, दि. २७ नोव्हेंबर २०२२ रोजी भोसरीतील गावजत्रा मैदानातून सकाळी ६ वाजता सायकल रॅली सुरू होणार आहे. या रॅलीसाठी सोशल मीडियासह विविध माध्यमातून नागरिकांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याला यावर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, दि.२६ नोव्हेंबर दुपारी १२ वाजेपर्यंत तब्बल १६ हजार १९० लोकांनी नोंदणी केली आहे, अशी माहिती अविरत श्रमदानचे डॉ. निलेश लोंढे यांनी दिली.पर्यावरण संवर्धन आणि इंद्रायणी नदी सुधार प्रकल्पाची जनजागृती करण्यासाठी पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील प्रत्येक घरापर्यंत पोहचण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. सर्व शाळा, सोसायटी, कंपन्यामध्ये जावून पर्यावरण संवर्धना अंतर्गत सायकल चालवा पर्यावरण वाचवा, नदी स्वच्छताबाबत जागृती करीत आहोत. अधिकाधिक नागरिकांनी या ‘पर्यावरण जागर’मध्ये सहभागी व्हावे. लोकांचा प्रतिसाद पाहता प्रत्यक्षपणे यावर्षी किमान २५ हजार सायकलपटू- नागरिक या रॅलीत सहभागी होतील, असा दावाही डॉ. लोंढे यांनी केला आहे.

### सेलिब्रेटी, मान्यवरांची उपस्थिती...

**गेल्या पाच वर्षांपासून रिव्हर सायक्लोथॉनचे आयोजन केले जाते. यावर्षी 'रिसायकल - रिड्युस - रियुज' हा विषय घेऊन सायक्लोथॉन होणार आहे. त्यासाठी प्रसिद्ध अभिनेते दिग्दर्शक प्रवीण तरडे, ट्रिपल महाराष्ट्र केसरी नरसिंग यादव, गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड सायकलपटू प्रिती म्हस्के, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, ‘पीएमआरडीए’ आयुक्त राहुल महिवाल आदी उपस्थित राहणार आहेत.**

### स्वंयसेवी संस्था अन् संघटनांचा पुढाकार...

या अभिनव उपक्रमाला रोटरी क्लब ऑफ उद्योगनगरी, पर्यावरण गतविधी, होप मानसिक पुनर्वसन व व्यसनमुक्ती केंद्र, डॉक्टर्स असोसिएशन, फार्मासिस्ट असोसिएशन, वकील संघटना, रोटरी क्लब, लायन्स क्लब, माजी सैनिक संघटना, पतंजली योग, महाराष्ट्रातील सर्व सायकल प्रेमी संस्था, सर्व पर्यावरणप्रेमी संस्था आदींनी पाठींबा दर्शविला असून प्रत्यक्ष सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे तृतीय पंथीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी यातील एक रॅली ते ‘लीड’ करत आहे. अविरत श्रमदान, सायकल मित्र, महेशदादा स्पोर्टस फॉडेशन व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका , पर्यावरणप्रेमी संस्थां यांच्या संयुक्त पुढाकाराने होणाऱ्या या रॅलीला प्रचंड गर्दी होणार असून, प्रशासनाने वाहतुकीत बदलही केला आहे.

# भारतीय संविधानामुळे देश एकसंध राहिला: सतिश काळे

## संभाजी ब्रिगेडच्या वतीने संविधान प्रास्ताविकेचे वाटप



। पिंपरी। महाईन्यूज ।

पिंपरी : विविध जात, धर्म, प्रांत, भाषा, परंपरा आणि संस्कृतीने नटलेल्या खंडप्राय भारत देशाला संविधानाने एकसंध ठेवले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात केलेल्या तरतुदी या भारतीयांना मध्यवर्ती ठेवून केलेल्या आहेत. कोणत्याही देशाने कितीही वक्रदृष्टी ठेवली तरी जोपर्यंत चंद्र-सूर्य आहेत. तोपर्यंत हा देश एकसंध राहील, असे प्रतिपादन पिंपरी-चिंचवड संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष सतिश काळे यांनी केले.

संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात संभाजी ब्रिगेडच्या वतीने संविधानाच्या प्रास्ताविक प्रतचे सामुहिक वाचन केले. या वेळी मार्गदर्शन करताना सतिश काळे बोलत होते. या वेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास संभाजी ब्रिगेडचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष भैय्यासाहेब गजधने यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर संविधान प्रस्ताविकेचे येणाऱ्या नागरिकांना वाटप करण्यात आले.

या वेळी संभाजी ब्रिगेडचे शहर अध्यक्ष सतिश काळे, उपाध्यक्ष रविंद्र चव्हाण, कार्याध्यक्ष ज्ञानदेव लोभे, सचिव मंगेश चव्हाण, संघटक राजेंद्र पवार, बिरसा मुंडा संघटनेचे पांडुरंग परचंडराव, सचिन जाधव, योगेश पाटील आदींसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

काळे म्हणाले की, देशात विविध जात धर्माचे लोक एकत्रित नांदत आहेत. हे सर्व एकेमकांशी प्रेमाचे सलोख्याचे संबंध ठेऊन आहेत. अनेकदा जातीय द्वेष पसरविण्याचे काम काहींनी केले आहे. मात्र त्यांचा हा हेतू हाणून पाडण्याची ताकद संविधाना मध्ये. देशातील एकता, बंधुता टिकविण्यासाठी संविधानाचा जागर सर्वत्र होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन काळे यांनी केले..

# आता उद्धव ठाकरेंचंही 'लाव रे ती क्लिप'!

## देवेंद्रजी, लाज बाळगा म्हणत केली कडाडून टीका

।मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाचे प्रमुख उध्दव ठाकरे यांची आज बुलडाणा जिल्ह्यातील चिखली येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली. यावेळी उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यासह बंडखोर आमदार आणि भाजपवर कडाडून टीका केली. तसेच रेडे गेलेत गुवाहाटीला असं म्हणत उद्धव यांनी शिंदे गटाला हिणवलं. तसेच लाव रे ती ऑडिओ क्लीपप्रमाणे भाजपवर हल्लाबोल केला.**



उद्धव ठाकरे यांनी तत्कालीन विरोधीपक्ष देवेंद्र फडणवीस यांची जुनी ऑडियो क्लीप लावून फडणवीसांचं जुनं भाषण जाहीर सभेत ऐकवलं. त्यामध्ये देवेंद्र फडणवीस म्हणत होते की, मध्यप्रदेश सरकारने साडेसहा हजार कोटींची तरतूद करून शेतकऱ्यांचे वीजबील माफ केलं होतं. या सरकारने देखील मध्यप्रदेश पॅटर्न राबवायला हवा, असंही फडणवीस म्हणताना ऐकायला येत होते. त्यावर उद्धव ठाकरे म्हणाले की, देवेंद्रजी जनाची नाही तर मनाची लाज बाळगा. यावेळी उद्धव ठाकरे यांनी जाहीर सभेत शेतकऱ्यांची वीजबिल माफी करून दाखवा, असं आव्हान फडणवीसांना दिलं.

याआधी मनसे प्रमुख राज ठाकरे देखील लाव रे तो व्हिडीओ म्हणत भाजपवर हल्लाबोल करायचे. उद्धव यांनी यावेळी खोक्यांवरून शिंदे सरकारवर आणि बुलडाणा जिल्ह्यातील बंखोरांवर टीका केली. विदर्भातील खासदार बाईंनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना राखी बांधली. आता ईडी, सीबीआयची हिंमत आहे का आता चौकशी करायची, असा प्रश्न उपस्थित करत उद्धव यांनी भावना गवळी यांच्यावर टीका केली.

# ही मराठी मातीतील गद्दारी गाडायला हवी",

## बंडखोर शिंदे गटावर जोरदार चढवला हल्ला

।बुलढाणा ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मराठी मातीतील गद्दारी असा उल्लेख करत बंडखोर शिंदे गटावर जोरदार हल्ला चढवला. तसेच ही गद्दारी गाडण्यासाठी जिजाऊंच्या जन्मभूमीत सभा घेतल्याचं मत व्यक्त केलं. ते शनिवारी (२६ नोव्हेंबर) बुलढाण्यातील चिखली येथे आयोजित शेतकरी संवाद मेळाव्यात बोलत होते.



उद्धव ठाकरे म्हणाले, "दसऱ्याचा मेळावा परंपरेनुसार शिवतीर्थावर झाला. तो प्रचंड मोठा झाला. तेव्हाच मी ठरवलं होतं की शिवतीर्थापासून सुरुवात केल्यावर मुंबईच्या बाहेर माझी जी पहिली सभा होईल ती जिजाऊंचं जन्मस्थान असलेल्या माझ्या बुलढाण्यात घेईल. कारण ही मराठी मातीतील गद्दारी गाडायची असेल तर जिजाऊंचे आशीर्वाद घेऊनच पुढे निघालं पाहिजे. म्हणून मी आज तुमच्या समोर आलो आहे." आज संविधान सुरक्षित आहे का?" "आज संविधान दिन आहे. या दिवशी हे संविधान सुरक्षित आहे का इथून सुरुवात होते. चार-पाच दिवसांपूर्वी मी आणि प्रकाश आंबेडकर एकाच व्यासपीठावर आलो होतो.

### "काही जण 40 रेडे घेऊन गुवाहटीला गेले"

**उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, "काही जण ४० रेडे घेऊन गुवाहटीला गेले आहेत. हे रेडे मी म्हटलेलं नाही. त्यांच्याच मंत्रिमंडळातील एका मंत्र्याने आमचे ४० रेडे तिकडे गेल्याचं म्हटलं होतं. मी मुख्यमंत्री झाल्यावर शिवतीर्थावरच शपथ घेतली आणि पहिल्यांदा आमची कुलस्वामिनी एकविरा आईच्या दर्शनला गेलो. त्यानंतर मी अयोध्येला गेलो होतो."**

# कर्नाटक- महाराष्ट्र सीमावादामुळे दोन्ही राज्यातील एसटी सेवा विस्कळीत

। मुंबई ।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

कर्नाटका- महाराष्ट्र सीमावादामुळे दोन्ही राज्यातील एसटी सेवा वारंवार विस्कळीत होवू लागली आहे. या वादात प्रवाश्यांची गैरसोय होवू लागली आहे. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्माई यांनी महाराष्ट्रातील भूभागावर कर्नाटकचा दावा सांगितल्यानंतर नव्याने वाद सुरु झाला. काल कोल्हापूरमध्ये ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी बोम्माई यांची प्रतिकात्मक तिरडी यात्रा काढली. त्यांनी बस स्थानकात जाऊन आंदोलन केले. यामुळे कर्नाटक -महाराष्ट्र दोन्ही राज्यातील एसटी वाहतूक सेवा बंद झाली. परिस्थिती लक्षात घेऊन शनिवारी सकाळी महाराष्ट्र व कर्नाटक दोन्ही राज्यातील परिवहन सेवा सुरू झाली. दुपारपर्यंत वाहतूक सुरू होती. यामुळे प्रवाशांनाही दिलासा मिळाला. दुपारी कर्नाटकमध्ये कन्नड रक्षण वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. त्यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रतिमा फाडून टाकल्या. बंगरुळूमधून पुढील आठवड्यात बेळगावला हजार कार्यकर्ते जातील आणि कन्नड जनतेचे रक्षण करू, असे आव्हानात्मक विधान संघटनेच्या प्रमुखांनी माध्यमांशी बोलताना केले. त्यांचा हा पवित्र लक्षात घेऊन दुपारनंतर पुन्हा दोन्ही राज्यातील वाहतूक बंद झाली.

### खाजगी वाहतूक जोमात

**दरम्यान कोल्हापूर वगळता जिल्ह्याच्या अन्य काही आगारांमधून कर्नाटकला एसटी सुरू होती. तर कर्नाटकातूनही महाराष्ट्रामध्ये बस येत होत्या. वाद पाहून प्रवाशी खाजगी वाहनाकडे वळले आहेत. अधिक दर आकारून ही वाहतूक सुरु होती.**



# 'विकासभिमुख कारभारामुळे विरोधकांमध्ये जळफळाट'

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची टीका

। मुंबई ।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

आमच्यावर गद्दारी केली, असा आरोप करणाऱ्यांनी खरेतरं बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांशी गद्दारी केली आहे. त्यांना आम्ही विकासाभिमुख कारभारातून उत्तर देतोय. हा मिंदे गट नव्हे तर बाळासाहेबांच्या विचारांचा सच्चा शिंदे गट असल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. कराडमध्ये बाळासाहेबांची शिवसेना पक्षाच्या मेळाव्यात ते बोलत होते. मेळाव्यात पालकमंत्री शंभूराज देसाई, उद्योगमंत्री उदय सामंत यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच कराड पालिकेतील यशवंत विकास आघाडीचे प्रमुख माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र यादव, हणमंत पवार, विजय वाटेगावकर यांच्यासह माजी नगरसेवकांनी बाळासाहेबांची शिवसेनामध्ये जाहीर प्रवेश केला.

एकनाथ शिंदे म्हणाले, की राज्यात गेल्या चार महिन्यात लोकहिताचे निर्णय होताना सामाजिक विकासाने गती घेतल्याने विरोधकांमध्ये जळफळाट होत आहे. त्यातूनच त्यांचे वाट्टेल ते बोलणे सुरु आहे तरी या विरोधकांनी टीका करण्यापेक्षा हिंमत असेल तर सरकार पाडून दाखवावे, असे खुले आव्हान शिंदे यांनी दिले. खोकी घेणाऱ्यांपैकी नव्हे तर देणाऱ्यांमध्ये आम्ही असल्याने कराडच्या विकासासाठी आवश्यक निधी दिला जाईल. पन्नास नव्हेतर शंभर कोटींचा निधी देताना मागेपुढे पाहणार नाही. आजच्या राजेंद्र यादव व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पक्षप्रवेशामुळे इथे विकासाचे नवे पर्वच सुरु झाल्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांनी दिला.




बाळासाहेब ठाकरे म्हणत की मला एक दिवसासाठी पंतप्रधान करा, काश्मीरमधील ३७० कलम हटवून दाखवतो. ते तेच काम पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केले. राज्यात मुख्यमंत्री शिवसेनेचा असताना शिवसैनिकांच्या केसालाही धक्का लागू देणार नाही. हाच विश्वास मी सगळ्यांना देतोय. तो लोकांना पटतोय. म्हणून तर दररोज पक्षप्रवेश होतच आहेत. आम्हाला कमी चेंडूत जादा धावा कशा काढायच्या, हे चांगले माहीत आहे. त्यामुळे अडीच वर्षांमध्ये राज्यातील सरकार पथदर्शी काम करून दाखवेल असाही विश्वास मुख्यमंत्र्यांनी दिला. आमदार शहाजीबापू पाटील, महेश शिंदे यांचीही भाषणे झाली.

## शॉर्ट न्यूज

### हल्ल्यातील हुतात्म्यांचे देशवासीयांकडून 'कृतज्ञ स्मरण'

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

देशाची आर्थिक राजधानी मुंबईवर १४ वर्षांपूर्वी आजच्याच दिवसी झालेल्या भ्याड अतिरेकी हल्ल्यात ज्यांनी प्राण गमावले त्यांना देशवासीयांनी आज आदरांजली अर्पण केली. या हल्ल्याचे सूत्रधार जे आजही विदेशात दडून बसले आहेत त्यांना कायदयाच्या चौकटीत आणून त्वरित कठोर कारवाई करावी असे आवाहन भारताने पाकिस्तानचा नामोल्लेख न करता केले आहे. याच दिवशी पाकिस्तानातून मुंबई शहरात सागरी मार्गाने घुसलेल्या पाकिस्तानी दहशतवाद्यांनी २६ परदेशी नागरिकांसह १६६ लोकांचे प्राण घेतले होते. दरम्यान राज्यघटना दिनानिमित्त झालेल्या कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २००८ मधील मुंबई दहशतवादी हल्ल्याचेही स्मरण केले. ते म्हणाले की आज भारत राज्यघटना दिन साजरा करत असताना याच दिवशी जेव्हा दहशतवाद्यांनी, मानवतेच्या शत्रूंनी भारतावर सर्वात भयानक हल्ला केला. त्यात ज्यांनी आपले प्राण गमावले त्यांना देश आज विनम्र श्रद्धांजली अर्पण करतो आहे.

# तरुणांना 20 लाख नोकऱ्या, विद्यार्थिनींना स्कुटी!

## गुजरात निवडणुकीसाठी भाजपचा जाहीरनामा

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

गुजरात विधानसभा निवडणुकीसाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना सत्ताधारी भाजपने शनिवारी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात भाजपने मतदारांना डोळ्यासमोर ठेवून 20 लाख तरुणांना रोजगार, तसेच विद्यार्थिनींना इलेक्ट्रिक स्कुटी, 2 एम्स स्तरावरील संस्थांची स्थापना आणि 10 लाखांचा आरोग्य विमा यांसह अनेक मोठी आश्वासने दिली आहेत.



भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांनी शनिवारी गांधीनगर येथील प्रदेश कार्यालयात हा जाहीरनामा प्रसिद्ध केला. यावेळी त्यांनी सांगितले की, गुजरात ही संतांची भूमी आहे. भाजप सरकार जे सांगतं तेच करते. आम्ही संविधानाचे पालन करत असतो. आमच्या या संकल्प पत्राने गुजरातचा नक्की विकास होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले की, संविधान हा आपला सर्वात मोठा धर्म आहे, त्याचं पालन करणं आणि ते सुरक्षित ठेवणं ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. सुजलाम सुफलाम योजनेंतर्गत 'सिंचन योजना' पुढं नेण्यासाठी आम्ही 25 हजार कोटी रुपये खर्च करणार आहोत. यासह आम्ही दक्षिण गुजरात आणि सौराष्ट्रमध्ये 2 सी फूड पार्क उभारणार आहोत, असेही नड्डांनी जाहीर केले.

### भाजपच्या जाहीरनाम्यात मोठी आश्वासने

- भाजपच्या जाहीरनाम्यात आयुष्मान भारत योजनेंतर्गत 5 लाखांपर्यंतचा आरोग्य विमा आता 10 लाख करण्यात येणार आहे.
- पुढील 5 वर्षात गुजरातमधील तरुणांना 20 लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.
- 10,000 कोटी रुपयांच्या बजेटमध्ये 20,000 सरकारी शाळांचं रूपांतर उत्कृष्ट शाळांमध्ये केलं जाईल.
- 3 सिव्हिल मेडिसिटी, 2 एम्स स्तरावरील संस्था, विद्यमान रुग्णालये, सीएचसी आणि पीएचसीच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी 10,000 कोटी रुपयांचा महाराजा श्री भागवत सिंह स्वास्थ्य कोष तयार केला जाणार आहे.

## गुवाहाटीच्या चौकाचौकात लागले महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे बॅनर

गुवाहाटी : महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि बाळासाहेबांच्या शिवसेनेचे आमदार आज गुवाहाटी येथील कामाख्या देवीच्या दर्शनासाठी जाणार आहेत. त्यावेळी ते तेथील काही स्थानिक नेत्यांच्या भेटीही घेणार असल्याची माहिती आहे. त्यांच्या दौऱ्याची जय्यत तयारी चालू असून गुवाहाटीमधील चौकामध्ये मुख्यमंत्र्यांच्या स्वागताचे बॅनर लावण्यात आले आहेत.

दरम्यान, राज्यात विधानपरिषदेच्या निवडणुका झाल्यानंतर राज्यात राजकीय स्फोट झाला होता. शिवसेनेतील एकनाथ शिंदे गट हा ४० आमदारांसहित बाहेर पडला. या आमदारांना घेऊन ते गुवाहाटीला गेले होते. जवळपास एका आठवड्यानंतर ते परत महाराष्ट्रात आले होते. त्यानंतर राज्यातील महाविकास आघाडी सरकार कोसळलं आणि एकनाथ शिंदे यांनी भाजपसोबत सत्ता स्थापन केली.

राज्यात सत्तांतर झाल्यानंतर पाच महिन्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे परत गुवाहाटीला जाणार आहेत.

# ना लाट ना स्टार प्रचारक, 'ओक्के'मध्ये असलेली काँग्रेस

## मोदी-शाहांना देणार दणका?





कोलकाता । महाईन्यूज ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा बालेकिल्ला असलेल्या गुजरातमध्ये येत्या डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात निवडणुका पार पडणार आहेत. एकीकडे भाजप आणि आपकडून निवडणुकीत संपूर्ण ताकद लावली जात आहे. तर दुसरीकडे या लढाईतून काँग्रेसने एकप्रकारे माघार घेतलेली दिसत आहे. त्यामुळे गुजरातमध्ये काँग्रेसची जागा आता आम आदमी पक्ष घेणार का? असा प्रश्न विचारला जात आहे. आपच्या वाढत्या प्रभावामुळे काँग्रेस राज्यातील विरोधी पक्षाचे स्थान देखील गमवण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गेल्या काही निवडणुकांमध्ये अखेरच्या क्षणी जोर लावणे, हे काँग्रेसचे वैशिष्ट्ये दिसून येत आहे. काही निवडणुकांमध्ये याचा फटका बसला, तर काही ठिकाणी फायदाही झाला आहे. आता काँग्रेस गुजरातमध्ये देखील हेच करताना दिसत आहे. परंतु, २०१७ ची कामगिरी काँग्रेस पुन्हा करणार की आप मुसंडी मारणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. मात्र, असे अनेक घटक आहेत, जे काँग्रेसच्या कामगिरीबाबत अनिश्चितता दर्शवतात.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसला शेवटच्या महिन्यात आलेली जाग ही काही नवीन गोष्ट नाही. २००७ आणि २०१२ च्या निवडणुकीत देखील हेच पाहायला मिळाले होते. असे असतानाही काँग्रेसने आपला वोट शेअर कायम ठेवला होता. राज्यात कोणतेही प्रमुख नेतृत्व नसले तरीही स्थानिक स्तरावरील कार्यकर्त्यांच्या जोरावर काँग्रेस काही प्रमाणात टिकून आहे. गेल्या अनेक निवडणुकांमध्ये काँग्रेसला वोट शेअर कायम ठेवण्यात यश आले आहे. खुद्द नरेंद्र मोदी मुख्यमंत्री असतानाही काँग्रेसचे वोट शेअर ३८ टक्के होते. गुजरात विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे वोट शेअर ३० टक्क्यांपेक्षा खाली गेलेले नाही.

गुजरातमधील काही ठराविक भागांमध्ये काँग्रेसचे नेहमीच वर्चस्व पाहायला मिळते. खेडब्रम्हा, दरियापूर, जमलपूर-खाडिया आणि वडगामसह असे अनेक मतदारसंघ आहेत, जेथे गेल्या दोन दशकात काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव झालेला नाही. आदिवासी आणि अल्पसंख्यांक समुदायची जास्त लोकसंख्या असलेल्या भागात देखील काँग्रेसचे वर्चस्व आहे. खास करून उत्तर गुजरात आणि सौराष्ट्र येथील काही मतदारसंघात काँग्रेस मतदारांना आकर्षित करण्यास यशस्वी ठरली आहे. गेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेसच्या दलित मतदारांमध्ये वाढ झाल्याचे देखील अनेक रिपोर्टमध्ये समोर आले आहे. परंतु, गेल्या अनेक निवडणुकांमध्ये विजय मिळवलेल्या जागांवर भाजपला आता अडचणीचा सामना करावा लागत आहे. आप, एआयएमआयएम आणि भारतीय ट्रायबल पक्षाच्या वाढत्या प्रभावाचा काँग्रेसला फटका बसणार हे नक्की.

यंदाच्या निवडणुकीमध्ये काँग्रेसला स्वतःच्याच चुकीचा फटका बसण्याची शक्यता आहे. २०१७ च्या निवडणुकीमध्ये काँग्रेसने संपूर्ण ताकद पणाला लावली होती. यामुळे भाजपला ९९ जागांवर समाधान मानावे लागले. यावेळी तशाप्रकारच्या प्रचाराचा अभाव पाहायला मिळत आहे. मागील निवडणुकीत पाटीदार समाजाचे आंदोलन, उना येथे दलित व्यक्तींना झालेली मारहाण आणि ओबीसी आरक्षणात बदलावरून झालेले आंदोलन यावरून राजकारण चांगलेच तापले होते. या आंदोलनांमुळे काँग्रेसला दलित व अल्पसंख्यांक मतदारांना जवळ करणे शक्य झाले होते. परंतु, यंदा कोणतेच फॅक्टर काँग्रेसच्या बाजूने नाही.

यंदाच्या निवडणुकीत आपचा वाढता प्रभाव देखील काँग्रेसला धोकादायक ठरू शकतो. गुजरातमध्ये आतापर्यंत केवळ भाजप आणि काँग्रेस हेच दोन प्रमुख पक्ष होते. परंतु, आता आपच्या रुपात तिसऱ्या पक्षाच्या झालेल्या एंट्रीने भाजप, काँग्रेसचे धाबे दणाणले आहेत. निवडणुकीमध्ये आप किती प्रभाव टाकणार, हे आताच सांगणे कठीण आहे.

# ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांचं निधन




रंगभूमी, चित्रपट आणि दूरचित्रवाणी मालिका अशा सर्वच माध्यमांतून आपल्या अभिनय कर्तृत्वाचा ठसा उमटवून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे ज्येष्ठ अभिनेते-दिग्दर्शक विक्रम चंद्रकांत गोखले (वय ७७) यांचे प्रदीर्घ आजाराने खासगी रुग्णालयात निधन झाले. सीमेवर लढणाऱ्या जवानांना अर्थसाह्य करण्याबरोबरच रोखठोक भूमिका घेणारे पारदर्शी व्यक्तिमत्त्व असा सामाजिक भान जपणारा कलाकार काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांच्यामागे पत्नी वृषाली आणि कन्या असा परिवार आहे.

विक्रम गोखले यांचं पार्थिव आज दुपारी चार वाजता पुण्यातील बालगंधर्व रंग मंदिर येथे अंतिम दर्शनासाठी ठेवलं जाणार आहे. त्यानंतर सहाच्या सुमारास वैकुंठ स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. विक्रम गोखले हे गोखले घराण्याच्या अभिनय परंपरेतील चौथ्या पिढीचे प्रतिनिधी होते. त्यांच्या पणजी दुर्गाबाई कामत या भारतीय चित्रपटसृष्टीतील पहिल्या स्त्री अभिनेत्या, तर आजी कमलाबाई गोखले (पूर्वाश्रमीच्या कमलाबाई कामत) या पहिल्या बाल-अभिनेत्री होत्या. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक दादासाहेब फाळके यांची निर्मिती आणि दिग्दर्शन असलेल्या १९१३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'मोहिनी भस्मासुर' चित्रपटात दुर्गाबाई यांनी पार्वतीची आणि कमलाबाईंनी मोहिनीची भूमिका केली होती.



# 'रणवीर-दीपिकाने मुंबईत खरेदी केले आलिशान घर

बॉलिवूड मधील सर्वात लोकप्रिय जोडी म्हणजे रणवीर – दीपिका. या जोडीला प्रेक्षकांची सुद्धा मोठ्या प्रमाणावर पसंती मिळाली. या दोन्ही कलाकारांनी आपल्या दमदार अभिनयाने चाहत्यांचे भरभरून मनोरंजन केले आहे. नुकतंच या कपलने मुंबईत एक आलिशान घर घेतले आहे. त्यांच्या फ्लॅटचा एक व्हिडिओसुद्धा समोर आला आहे.



24 नोव्हेंबर रोजी दीपिका-रणवीरच्या नवीन घराचा व्हिडिओ शेअर करण्यात आला होता. दीपवीरचे नवीन घर सध्या तयार होत असल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. त्या इमारतीच्या गेटसमोर एक एलईडी लावण्यात आला आहे ज्यामध्ये घर पूर्ण बांधल्यानंतर ते घर कसे दिसेल हे दिसत आहे.

ऑगस्टमध्ये, रणवीर आणि दीपिकाने त्यांच्या घरातील गृह प्रवेश पूजेचे फोटो शेअर केले होते जे इंटरनेटवर व्हायरल झाले होते. फोटोंमध्ये रणवीर आणि दीपिका होम-हवन करताना दिसत आहेत. त्यांचे नवीन घर पाहण्यासाठी चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. दीपिका-रणवीर 10 वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये आहेतदीपिका-रणवीर त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात नेहमीच एकमेकांसोबत वेळ घालवताना दिसतात. त्यांना एकमेकांसोबत 10 वर्षे झाली आहेत. रणवीरने एका मुलाखतीत सांगितले होते की, तो आणि त्याची पत्नी दीपिका २०१२ पासून रिलेशनशिपमध्ये आहेत.

# सनी देओलच्या 'बाप ऑफ ऑल फिल्म्स'मधील बीटीएस

90 च्या दशकातील बॉलिवूड सुपरस्टार अभिनेते सनी देओल, मिथुन चक्रवर्ती, जॅकी श्रॉफ आणि संजय दत्त हे सध्या त्यांच्या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहेत. येत्या काही दिवसांत त्यांचा 'बाप ऑफ ऑल फिल्म्स' चित्रपट प्रदर्शित होणार आहे. मागील काही दिवसांपूर्वी या चित्रपटाची घोषणा करण्यात आली होती. दरम्यान, आता या चित्रपटातील एक बीटीएस व्हिडिओ देखील समोर आला आहे. जो पाहून चाहते खूप उत्सुक झाले



# पुन्हा एकदा 'देवयानी' मालिका होणार प्रक्षेपित

टीव्ही विश्वात नवनवीन घडामोडी घडत असतात. टाळेबंदीमध्ये लोकांनी जुन्या दर्जेदार मालिका पुन्हा पुन्हा बघितल्या. 'आभाळमाया', 'प्रपंच', '४०५ आनंदवन', 'थरार' या मालिका प्रेक्षकांच्या लक्षात आहेत. डेली सोप हा प्रकार उदयास आल्यानंतरदेखील काही मालिका प्रेक्षकांच्या पसंतीस पडल्या त्यातीलच एक मालिका म्हणजे 'देवयानी'. प्रेक्षकांसाठी म्हणजे ही मालिका पुन्हा एकदा पाहता येणार आहे. 'आई कुठे काय करते', 'या फुलाला सुगंध मातीचा' स्टार प्रवाहवरील या मालिका आज प्रेक्षकांच्या मनात घर करून आहेत. मात्र १० वर्षांपूर्वी गाजलेली मालिका म्हणजे 'देवयानी'. रात्री ८.३० वाजता ही मालिका स्टार प्रवाह वाहिनीवर प्रसारित व्हायची. या मालिकेने प्रेक्षकांना वेड लावले होते. या मालिकेतील पात्र आजही प्रेक्षकांच्या लक्षात आहेत. देवयानी, संग्राम, आबासाहेब अशी प्रसिद्ध पात्र. संग्रामचा 'तुमच्यासाठी काही पण' हा डायलॉग खूप प्रचलित झाला होता. या मालिकेत शिवानी सुर्वे, संग्राम साळवी, नागेश भोसले, देवदत्त नागे, माधव देवचके, भाग्यश्री मोटे असे दिग्गज कलाकार या मालिकेत होते . या मालिकेची लोकप्रियता पाहता वाहिनीने या मालिकेचे पुनःप्रक्षेपण करण्याचा निर्णय घेतला असून ही मालिका १८ डिसेंबर पासून संध्याकाळी ४.३० वाजता ही मालिका प्रक्षेपित होईल. वाहिनीच्या या निर्णयाने या मालिकेचे चाहते नक्कीच खुश होतील.

# पालकांसाठी 'बालभारती'ची उजळणी..



**शिक्षण ही मूलभूत गरज आहे, मात्र शिक्षणाचे माध्यम कोणते हवे ही काळाच्या ओघाने बदलत चाललेली विचारधारा आहे.**

शिक्षण ही मूलभूत गरज आहे, मात्र शिक्षणाचे माध्यम कोणते हवे ही काळाच्या ओघाने बदलत चाललेली विचारधारा आहे. आपल्या पाल्याला चांगले आणि उच्च दर्जाचे शिक्षण इंग्रजी भाषेतच मिळेल अशी एकूण विचारधारा असणाऱ्या पालकांशी नव्याने संवाद साधणारा चित्रपट म्हणून नितीन नंदन दिग्दर्शित 'बालभारती' या चित्रपटाचा उल्लेख करता येईल. २ डिसेंबरला प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटातील कलाकार सिद्धार्थ जाधव, नंदिता पाटकर, अभिजीत खांडेकर आणि बालकलाकार आर्यन मेंघजी यांच्याबरोबर 'लोकसत्ता'च्या कार्यालयात गप्पा रंगल्या. चित्रपट करण्याआधी तो शिक्षणावरच करायचा असे ठरले नव्हते. बऱ्याचदा आपल्या पाल्यांना कोणत्या शाळेत घालायचे यावरून नातेवाईकांमध्ये कधीही न संपणारी चर्चा रंगते. मात्र, आपल्या पाल्याला शिक्षणासाठी कोणत्या शाळेत घालायचे यापेक्षा त्या मुलांचे पालक आपल्या मुलांच्या योग्य शिक्षणासाठी काय मेहनत आणि धडपड करतात?, हे मला चित्रपटातून प्रेक्षकांपर्यंत आणि पालकांपर्यंत पोहोचवायचे होते. परंतु चांगली शाळा कोणती हे कसे ठरवायचे? तर त्या शाळांमध्ये शिक्षक कसे आहेत यावरून त्या शाळेबदद्लचा चांगल्या – वाईटाचा निर्णय घ्यावा. चांगली शाळा ही शिक्षकांमुळेच घडते, असे प्रामाणिक मत नितीन नंदन यांनी मांडले.

**विनोद हा माझा बाज पण..**

आजवर अभिनेता सिद्धार्थ जाधवला प्रेक्षकांनी विनोदी भूमिकेत काम करताना पाहिले आहे. मात्र, या चित्रपटात त्याने वडिलांची भूमिका साकारली आहे जी एका अंगाने जरी विनोदी असली तरी मोठ्या जबाबदारीची भूमिका आहे. याबद्दल सांगताना सिद्धार्थ म्हणतो, 'विनोद हा माझा बाज आहे, पण विनोदाबरोबरच अभिनयाचे जे विविध अंग आहेत ते बालभारती चित्रपटामुळे आणि दिग्दर्शक नितीन नंदन यांच्यामुळे मला अनुभवायला मिळाले, कारण दिग्दर्शकाचे म्हणणेच हे आहे की तुम्ही आतापर्यंत किती, काय मोठे काम केले आहे याच्याशी मला देणेघेणे नाही. तुम्ही या चित्रपटात सहज-नैसर्गिक पध्दतीने काम करणे अपेक्षित आहे. त्यामुळे त्याच्या म्हणण्यानुसार या भूमिकेचा विचार करताना मी माझ्या वडिलांचे आणि माझे नाते कसे होते? शिवाय बाबा म्हणून मी कसा आहे?, या दोहोंची सांगड घालत ही राहूल देसाईची व्यक्तिरेखा साकारली आहे.'

**कलाकार रमले जुन्या आठवणींत**

या चित्रपटात वडील आणि मुलाचे नाते केंद्रस्थानी आहे. आत्ताचे वडील हे मुलांशी मैत्रीचे नाते निर्माण करण्यासाठी धडपडतात. वडील-मुलाच्या मैत्रीच्या नात्याबद्दल अधिक सांगताना सिध्दार्थ म्हणाला, माझ्या घरी वडील एकटे कमावते आणि शिक्षण घेणारी अपत्य तीन. त्यामुळे मानसिक, आर्थिक, शारीरिक खस्ता खात त्यांनी आम्हा तिन्ही भावंडाना शिकवले, पण आम्ही तुझ्यासाठी एवढ्या खस्ता खातो आहोत हे कधी त्यांनी बोलून दाखवले नाही. आपण मात्र कळत-नकळत आपल्या मुलांकडून अपेक्षा करतो हे चुकीचे आहे. या चित्रपटात बाप म्हणून मी हरलो असे सांगत माझी व्यक्तिरेखा स्वत:च्या कानाखाली मारून घेते असा प्रसंग आहे. वाटली. अभिजीतनेही यावेळी वडिलांची नोकरी आणि बदल्यांमुळे त्याचे शिक्षण बीड, परभणी, अहमदनगर अशा ग्रामीण भागांमध्ये कसे गेले आणि केवळ मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी हट्टाने वडिलांनी नाशिकला कायमस्वरूपाची बदली कशी घेतली, याची आठवण सांगितली. 'इंग्रजी भाषेचा न्यूनगंड हा आजही मोठा विषय आहे.

## शॉर्ट न्यूज »

### अमेरिका इंग्लंडविरुद्ध अपराजितच!



अल रायन। महाईन्यूज

अमेरिकेच्या संघाने विश्वचषक फुटबॉल स्पर्धामध्ये बलाढ्य इंग्लंडला रोखण्याची प्रथा यंदाही कायम राखली. शनिवारी मध्यरात्री झालेला अमेरिका-इंग्लंड सामना गोलशून्य बरोबरीत संपला. दोन्ही संघांकडून गोल करण्याचे अनेक प्रयत्न झाले, पण त्यांना गोलचे खाते अखेपर्यंत उघडता नाही.

अमेरिकेकडून आघाडीपटू ख्रिस्टियन पुलिसिक आणि वेस्टन मॅकेनी यांनी गोल करण्याचे चांगले प्रयत्न केले. मात्र, त्यांना गोल करण्यात यश आले नाही. दोघांनीही मारलेले फटके गोलपोस्टला धडकून बाहेर गेले. या निकालाचे वैशिष्ट्य म्हणजे इंग्लंडला विश्वचषक स्पर्धेत पुन्हा एकदा अमेरिकेवर विजय मिळविण्यात अपयश आले. यापूर्वी उभय संघांमध्ये झालेले विश्वचषकातील दोनही सामने अमेरिकेने जिंकले होते.

# शेवटच्या क्षणी बाजी मारत ऑस्ट्रेलियाने भारताला चारली धूळ

भारतीय हॉकी संघाला ऑस्ट्रेलियाकडून पहिल्या सामन्यात पराभव पत्करावा लागला.

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।



पाच सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना आज भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात खेळला गेला. या सामन्यात आकाशदीप सिंगची हॅट्रिकही भारतीय पुरुष हॉकी संघासाठी व्यर्थ गेली. कारण पहिल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून भारताचा शेवटच्या क्षणी ४-५ अशा फरकाने पराभव झाला. आकाशदीप सिंगने (१०, २७ आणि ५९ व्या मिनिटाला) तीन गोल केले तर कर्णधार हरमनप्रीत सिंगने (३१व्या मिनिटाला) पेनल्टी कॉर्नरला गोलमध्ये रुपांतरित केले.

ऑस्ट्रेलियाकडून लचलान शार्प (५व्या), नॅथन इफ्राम्स (२१व्या), टॉम क्रेग (४१ व्या) आणि ब्लेक गोव्हर्स (५७ आणि ६० व्या) यांनी गोल केले.सामना संपण्याच्या दोन मिनिटे अगोदर भारत ४-३ ने पिछाडीवर होता. आकाशदीपने ५९व्या मिनिटाला गोल करत सामना बरोबरीत आणला, मात्र यादरम्यान दोन पेनल्टी हरमनप्रीतच्या संघाला महागात पडल्या. गोव्हर्सचा पहिला पेनल्टी चुकला, पण दुसऱ्या पेनल्टीवर त्याने आपला ११८ वा गोल केला आणि ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला.या विजयासह ऑस्ट्रेलियाने पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. मालिकेतील दुसरा सामना रविवारी होणार आहे.

**भारतीय संघ –**

**गोलरक्षक :** कृष्ण बहादूर पाठक, श्रीजेश परतू रवींद्रन

**बचावपटू:** जर्मनप्रीत सिंग, सुरेंदर कुमार, हरमनप्रीत सिंग (कर्णधार), अमित रोहिदास (उपकर्णधार), जुगराज सिंग, मनदीप मोर, नीलम संजीव ॲक्सेस, वरुण कुमार

**मिडफिल्डर:** सुमित, मनप्रीत सिंग, हार्दिक सिंग, समशेर सिंग, नीलकांत शर्मा, राजकुमार पाल, मोहम्मद. राहिल मौसेन, आकाशदीप सिंग, गुरजंत सिंग

**फॉरवर्ड्स:** मनदीप सिंग, अभिषेक, दिलप्रीत सिंग, सुखजीत सिंग

# मालिकेत टिकण्यासाठी भारताला उद्याचा सामना जिंकावाच लागणार

।नवी दिल्ली महाईन्यूज ।

भारतीय संघ सध्या न्यूझीलंड दौऱ्यावर आहे. या दौऱ्यातील भारताचा दुसरा वनडे सामना उद्या होणार असून, हॅमिल्टन येथे हा सामना होणार आहे. भारतीय संघासाठी हा सामना करो या मरो अशा परिस्थितीचा असणार आहे. ऑकलंडमध्ये शुक्रवारी झालेल्या पहिल्या वनडे सामन्यात न्यूझीलंडने भारताचा 7 गडी राखून पराभव केला होता.

या सामन्यात भारताने ३०६ धावा केल्या होत्या. मात्र तरिही भारतीय पराभूत झाला. केन विलियम्सन आणि टॉम लॅथम यांच्या खेळीच्या जोरावर न्यूझीलंडने पहिला वनडे सामना जिंकला. मात्र, उद्या होणार दुसरा वनडे सामना भारतासाठी महत्वाचा असल्याने हा सामना भारत जिंकणार का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

दुसऱ्या वनडे सामन्यात भारतीय संघात काही बदल होऊ शकतात. अष्टपैलू दीपक हुडा याला संधी दिली जाऊ शकते. तसेच फिरकीपटू चहल ऐवजी कुलदीपला संघात स्थान मिळू शकते. वेगवान गोलंदाजीत फारसे बदल होईल असे सध्या तरी चित्र दिसत नाही.

भारतीय संघ

शिखर धवन (कर्णधार), ऋषभ पंत (उपकर्णधार आणि यष्टिरक्षक), शुबमन गिल, दीपक हुडा, सूर्यकुमार यादव, श्रेयस अय्यर, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकूर, शाहबाज अहमद, युजवेंद्र चहल, अरविंद चहल, अरविंद चहल. सिंग, दीपक चहर, कुलदीप सेन, उमरान मलिक.



महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही